# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०४
# सभा क्र.०५, दिनांक ३०/०४/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब (शुक्रवार, दि. २५/०४/२०२५ रोजीची) सभा बुधवार, दि. ३०/०४/२०२५ रोजी दुपारी ३.४० (तीन वाजून चाळीस मिनिटे) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि.) |
| मा. सौ. योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा. उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. सौ. प्रतिभा पाटील | – | उपायुक्त, (सा.प्र. व भूसंपादन) |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. नंदकिशोर जगताप | – | मुख्य अभि.(पापु.) |
| मा. युवराज देशमुख | – | मुख्य अभि.(पापु.) |
| मा. श्रीमती कल्पना बळीवंत | – | सहा. आरोग्य अधिकारी |
| मा. श्रीमती मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.
नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

**वृत्तांत कायम करणे**

मा. स्थायी समिती सभा क्र. ७१, दि. २८/०३/२०२५, सभा क्र. ०१, दि. ०४/०४/२०२५, सभा क्र. ०२, दि. ११/०४/२०२५, सभा क्र. ०३, दि. १७/०४/२०२५ व सभा क्र. ०४, दि. २५/०४/२०२५ असे एकूण ५ वृत्तांत कायम करण्यात आले.

**कार्यपत्रिकेवरील विषय**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.४८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ कार्यालयाचे नियंत्रणाखालील ढोले पाटील, येरवडा कळस धानोरी व नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे मार्च २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.१/४६, दि.२२/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.४९**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२५ ते १५/०३/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/४४, दि.२२/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.५०**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/४५, दि.२२/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.५१**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.३/४७, दि.२२/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.५२**

दिनांक २४/०३/२०२५ ते दिनांक ३०/०३/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ११२ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/४८, दि.२२/०४/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक– नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**<u>सर्वात कमी रकमेचे टेंडर्स</u>**

**विषय क्र.५३**

कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Vishal Baburao Dhotre यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६६,९७,०२५/- पेक्षा ३६.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,१९,७९५=४५ अधिक जीएसटी र.रु.७,५९,५६३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.९७,२८१/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५०,७६,६३९=४५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/५१, दि.२३/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – माहिती द्या.

मा. गोजारी, अधि.अभि.(ड्रेनेज) – पावसाळ्यापूर्वीची कामे आहेत.

मा. प्रशासक – ३६ टक्के बिलो असल्यावर कामे होतात का?

मा. गोजारी, अधि.अभि.(ड्रेनेज) – हो, कामे करतात.

मा. प्रशासक – ३६ टक्के बिलो असल्यावर इस्टिमेट चुकते की काय?

मा. गोजारी, अधि.अभि.(ड्रेनेज) – कामे आधीच सुरू केलेली आहेत.

मा. प्रशासक – त्यामध्ये सगळे चेक करा आणि त्यानंतरच मान्य करा आणि यामध्ये कुठली तरी एजन्सी नेमून थर्ड पार्टी ऑडिट करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.५४**

औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Vishal Baburao Dhotre यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७,५३,७३६/- पेक्षा ३३.९३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४,६२,१९३=३८ अधिक जीएसटी र.रु.८,०३,१९५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२९,६१७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५२,९५,००५=३८ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/५२, दि.२३/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.५५**

येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NIRMAL MOTIITAL HARIHAR यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७३,४९,३४०/- पेक्षा ५१.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,०१,१७६=६ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६,४८,५४०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४२,४९,७१६=६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०४/०३/२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/५३, दि.२३/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा पण यामध्ये ॲडिशनल कमिशनर यांनी पाहणी करावी, पाहणी केल्याशिवाय बिले द्यायची नाहीत त्यानंतरच मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.५६**

येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NIRMAL MOTIITAL HARIHAR यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७,६७,१९३/- पेक्षा ५२.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,४८,२५२=६४ अधिक जीएसटी र.रु.५,८४,६८५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१४,५९२/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३८,४७,५२९=६४ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/५४, दि.२३/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा पण यामध्येही ॲडिशनल कमिशनर यांनी पाहणी करावी.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.५७**

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NIRMAL MOTIITAL HARIHAR यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७९,९९,७४६/- पेक्षा ४८.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,५९,८६७=९२ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४१,५९,८६७=९२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०६-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/५५, दि.२४/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र.५८**

आरोग्य कार्यालयाकडे करार पद्धतीने, एकवट मानधनावर, विविध संवर्गातील आजअखेर कामकाज करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/४३, दि.२१/०४/२०२५ चे पत्र.

१) मूळ निवेदनातील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्ता क्रमांक (अ), (ब) आणि (ड) मध्ये अंतर्भूत आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.), औषध निर्माता (फार्मासिस्ट) आणि दवाखाना सहाय्यक (विविध काम करणारे सेवक) या तीन संवर्गाच्या अस्थायी सेवांबाबत खाली नमूद दोन पर्यायांपैकी जो पर्याय अगोदर वास्तवात येईल, संबंधित पर्याय स्वीकारणेस-

(अ) उक्त नमूद तीन संवर्गातील सेवांसाठी, ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, पुढील ४४ दिवसांचे कालावधीसाठी (एक वेळेस) मुदतवाढ देणेस-

| **संवर्गाचे नाव** | **संवर्गनिहाय पदसंख्या** | **सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक** | **०१ दिवसाचा तांत्रिक खंड** | **प्रस्तावित मुदतवाढ** | **मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| दि. ०२/०३/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | |
| आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | ०६ | ०२/०३/२०२५ | ०३/०३/२०२५ | ४४ दिवस | १६/०४/२०२५ |
| औषध निर्माता (फार्मासिस्ट) | ०४ | ०२/०३/२०२५ | ०३/०३/२०२५ | ४४ दिवस | १६/०४/२०२५ |
| सहाय्यक दवाखाना (विविध काम करणारे सेवक) | १७ | ०२/०३/२०२५ | ०३/०३/२०२५ | ४४ दिवस | १६/०४/२०२५ |

| **संवर्गाचे नाव** | **संवर्गनिहाय पदसंख्या** | **सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक** | **०१ दिवसाचा तांत्रिक खंड** | **प्रस्तावित मुदतवाढ** | **मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| दि.१४/०२/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | |
| आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | ०८ | १४/०२/२०२५ | १५/०२/२०२५ | ४४ दिवस | ३१/०३/२०२५ |
| दि.१६/०२/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | |
| औषध निर्माता (फार्मासिस्ट) | १० | १६/०२/२०२५ | १७/०२/२०२५ | ४४ दिवस | ०२/०४/२०२५ |
| दि.१६/०३/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | |
| आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | २१ | १६/०३/२०२५ | १७/०३/२०२५ | ४४ दिवस | ३०/०४/२०२५ |
| दि.०५/०४/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| औषध निर्माता (फार्मासिस्ट) | ०१ | ०५/०४/२०२५ | ०६/०४/२०२५ | ४४ दिवस | २०/०५/२०२५ |
| सहाय्यक दवाखाना (विविध काम करणारे सेवक) | १७ | ०५/०४/२०२५ | ०६/०४/२०२५ | ४४ दिवस | २०/०५/२०२५ |

अथवा

ब) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्रमांक ०५, (मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, ठराव क्र. १/१६९, दि २३/०९/२०२४) अन्वये करार पद्धतीने, नव्याने भरती प्रक्रिया राबविणेहेतू, प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केलेल्या संदर्भ क्रमांक ०७ प्रस्तावाचे अनुषंगाने, नजीकच्या काळात, जाहिरात प्रसिद्ध करून भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कार्यवाही अंती, निवड झालेले उमेदवार रुजू होईपर्यंत मुदतवाढ देणे.

(२) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील मूळ निवेदनातील तक्ता क्रमांक (क) आणि (ड) मध्ये अंतर्भूत परिचारक (नर्सिंग ऑर्डली) आणि आया या दोन संवर्गाच्या अस्थायी सेवांबाबत खाली नमूद दोन पर्यायांपैकी जो पर्याय अगोदर वास्तवात येईल, संबंधित पर्याय स्वीकारणेस-

(अ)४४ दिवसांचे दोन टप्यात, प्रत्येकी ०१ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन, म्हणजेच ८८ दिवस कालावधीसाठी मुदतवाढीस देणेस-

| संवर्गाचे नाव | संवर्ग निहाय पदसंख्या | सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक | पहिला तांत्रिक खंड | प्रस्तावित मुदत वाढीचा पहिला टप्पा | मुदतवाढी चा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक | दुसरा तांत्रिक खंड | प्रस्तावित मुदत वाढीचा दुसरा टप्पा | मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दि. १५/०३/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | | | | |
| परिचारक (नर्सिंग ऑर्डर्ली) | ३१ | १५/०३/२०२५ | १६/०३/२०२५ | ४४ दिवस | २९/०४/२०२५ | ३०/०४/२०२ ५ | ४४ दिवस | १३/०६/२०२५ |
| दि. २०/०३/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | | | | |

| संवर्गाचे नाव | संवर्ग निहाय पदसंख्या | सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक | पहिला तांत्रिक खंड | प्रस्तावित मुदत वाढीचा पहिला टप्पा | मुदतवाढी चा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक | दुसरा तांत्रिक खंड | प्रस्तावित मुदत वाढीचा दुसरा टप्पा | मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आया | ५५ | २०/०३/२०२५ | २१/०३/२०२५ | ४४ दिवस | ०४/०५/२०२५ | ०५/०५/२०२५ | ४४ दिवस | १८/०६/२०२५ |
| दि.०५/०४/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | | | | |
| परिचारक (नर्सिंग ऑर्डर्ली) | ०८ | ०५/०४/२०२५ | ०६/०४/२०२५ | ४४ दिवस | २०/०५/२०२५ | २१/०५/२०२ ५ | ४४ दिवस | ०४/०७/२०२५ |
| दि. ०५/०४/२०२५ रोजी सद्यस्थितीतील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येणाऱ्या संवर्गाचे नाव व पदसंख्या | | | | | | | | |
| आया | १७ | ०५/०४/२०२५ | ०६/०४/२०२५ | ४४ दिवस | २०/०५/२०२५ | २१/०५/२०२५ | ४४ दिवस | ०४/०७/२०२५ |

अथवा

ब) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्रमांक ०५, (मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, ठराव क्र. १/१६९, दि. २३/०९/२०२४) अन्वये, परिचारक (नर्सिंग ऑर्डली) आणि आया या दोन संवर्गासाठी करार पद्धतीने, नव्याने भरती प्रक्रिया राबविणेहेतू, प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाल्यास, त्या अनुषंगाने, नजीकच्या काळात, जाहिरात प्रसिद्ध करून, करार पद्धतीने भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कार्यवाही अंती, निवड झालेले उमेदवार रुजू होईपर्यंत मुदतवाढ देणे.

<u>**(३) संवर्गनिहाय एकवट मानधनाबाबत**</u>

आरोग्य विभागांतर्गत आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.), औषध निर्माता (फार्मासिस्ट), दवाखाना सहाय्यक (विविध काम करणारे सेवक) या तीन संवर्गाच्या अस्थायी सेवांना ४४ दिवसांचे कालावधीसाठी, मुदतवाढ देताना, सद्यस्थितीत संवर्गनिहाय अदा केली जाणारी निर्धारित एकवट मानधनाची रक्कमच मुदतवाढीचे कालावधीसाठी देखील ग्राह्य धरणेस,

आरोग्य विभागांतर्गत परिचारक (नर्सिंग ऑर्डर्ली) आणि आया या दोन संवर्गाच्या अस्थायी सेवांना ४४ दिवसांचे कालावधीसाठी, दोन टप्प्यांत, प्रत्येकी एक दिवसांचे तांत्रिक खंडासहित, मुदतवाढ देताना, सद्यस्थितीत संवर्गनिहाय अदा केली जाणारी निर्धारित एकवट मानधनाची रक्कमच मुदतवाढीचे कालावधीसाठी देखील ग्राह्य धरणेस.

**(४) एकवट मानधनाचे रक्कमेसंबंधित अर्थशिर्षकाबाबत -**

करार पद्धतीने कामकाज करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना अदा करावयाचे एकवट मानधन खाली नमूद अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस

आर्थिक वर्ष २०२४-२५

RE17F147

रुग्णालये व दवाखाने सुरु करणेकरिता सेवकांचा पगार

**५) करार पद्धतीने सेवा घेताना कर्मचाऱ्यांचे पगारी रजांबाबत -**

सदर करार पद्धतीने मुदतवाढीच्या कालावधीत, संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना खाली नमूद केल्याप्रमाणे पगारी रजा देणेस-

(अ) किरकोळ रजा प्रत्येक महिन्याला एक दिवस

(ब) वैद्यकीय रजा - प्रत्येक महिन्याला एक दिवस

(आजारपणाच्या रजेची निकड भासल्यास, अत्यावश्यक गरज म्हणून)

**(६) करार पद्धतीने मुदतवाढीची सेवा घेताना करारनामे करणेबाबत -**

विविध संवर्गातील संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचेकडून, करार पद्धतीने, मुदतवाढीस निश्चित केल्या जाणाऱ्या कालावधीकरिता, सेवा घेणेसाठी नव्याने करारनामे करून घेणेस.

**(७) संबंधितांना द्यावयाच्या आज्ञापत्रकाबाबत-**

संबंधितांना द्यावयाचे आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस

**(८) करार पद्धतीची सेवा संपुष्टात आणणेबाबत -**

करार पद्धतीने मुदतवाढीच्या कालावधीमध्ये संबंधित संवर्गासाठी, कायम स्वरुपाची भरती (शेड्युलमान्य), महानगरपालिकेच्या संबंधित विभागामार्फत करणेत आल्यास, त्याच संवर्गात करार पद्धतीने, एकवट मानधनावर कामकाज करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांची सेवा संपुष्टात आणणेस.

**(९)आरोग्य खात्याची आवश्यकता लक्षात घेता पुढील ०३ महिन्यांकरिता अंतिम मुदतवाढ देणेस.**

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.५९**

मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे पुणे भेट दि. २६/९/२०२४ च्या अनुषंगे शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत ठिकठिकाणी बॅरिकेडिंग करणे हे काम महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार सर्वात कमी दराचे ठेकेदार सुरेश मंडप केंद्र यांचेकडून पुणे मनपा शेड्युलमान्य दरानुसार र.रु.३,९९,०००/- पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे होणाऱ्या बिलाची रक्कम अधिक जीएसटी याप्रमाणे सदर कामाचे बिल अदा करणेस व करार करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/४९, दि.२३/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.६०**

मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे पुणे भेट दि.२६/९/२०२४ च्या अनुषंगाने शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत ठिकठिकाणी बॅरिकेडिंग करणे व दि.१३/१०/२०२४ हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चाफेकर नगर येथील दवाखान्याच्या इमारतीचे उदघाटनासाठी मंडप व्यवस्था करणे हे काम महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार सर्वात कमी दराचे ठेकेदार श्री साई एंटरप्रायजेस यांचेकडून पुणे मनपा शेड्युलमान्य दरानुसार र.रु.१२,५७,८२२=७० अधिक जी.एस.टी. रक्कम पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे होणा-या बिलाची रक्कम अधिक जीएसटी याप्रमाणे सदर कामाचे बिल अदा

करणेस व त्यांच्याशी करार करणेस व केलेल्या कामांचे बील अदा करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेस अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/५०, दि.२३/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.६१त्वर्य**

वेलस्ली रोड ते जनाई माता मंदिर ते बंडगार्डन पूल पर्यंत ३० मीटर रुंदीचा डी.पी. रस्ता विकसित करणे या कामास आवश्यक खर्चाचे उत्तरदायित्व महाराष्ट्र म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये स्वीकारण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यत्ता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/५६, दि.२४/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.६२त्वर्य**

नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील "स्टेशन ऑफिसर्स ॲन्ड इंन्स्ट्रक्टर्स पाठ्यक्रम" करिता अग्निशमन दलातील केंद्र अधिकारी / स्टेशन ड्यूटी ऑफिसर या पदावरील खालीलप्रमाणे नमूद सेवाज्येष्ठता यादीनुसार ०६ सेवकांना ऑन ड्युटी पाठविणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/अग्निशमन/५८, दि.२४/०४/२०२५ चे पत्र.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | केंद्र अधिकारी या पदावर सेवेत नेमणूक झाल्याचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | सेवा निवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. सुनील दिगंबर नाईकनवरे | १३/०५/२०२२ | बी.ए., राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील प्राथमिक अग्रिशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम क्र.५१ उत्तीर्ण, एन.एफ.एस.सी. नागपूर येथील सब ऑफिसर्स कोर्स उत्तीर्ण, एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण | ३०/०९/२०३४ |
| ०२ | श्री. पंकज केशवराव जगताप | १३/०५/२०२२ | बी.एस्सी., इंस्टिट्यूट ऑफ फायर इंजिनिअर्स (इंडिया) यांचेकडील ग्रॅज्युएटशिप एक्झामिनेशन-२०१६ उत्तीर्ण, एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण | २८/०२/२०३३ |
| ०३ | श्री. सचिन शांताराम मांडवकर | १३/०५/२०२२ | बी.कॉम., राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम क्र.५१ उत्तीर्ण, एन.एफ.एस.सी. नागपूर येथील सब ऑफिसर्स कोर्स उत्तीर्ण, एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण, मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि., इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि | ३१/१२/२०३७ |
| ०४ | श्री. प्रदीप श्रीराम खेडेकर | १३/०५/२०२२ | बी.ए., राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम क्र.५१ उत्तीर्ण, एन.एफ.एस.सी. नागपूर येथील सब ऑफिसर्स कोर्स उत्तीर्ण, एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण | ३१/०३/२०३८ |
| ०५ | श्री. अनिल छगन गायकवाड | ०२/०९/२०२२ | बी.ए., राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम क्र.१६ उत्तीर्ण, एन.एफ.एस.सी. नागपूर येथील सब ऑफिसर्स कोर्स उत्तीर्ण, एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण | ३१/०७/२०३५ |
| ०६ | श्री. कमलेश रमेश सनगाळे | ०२/०९/२०२२ | बी.ए., एन.एफ.एस.सी. नागपूर येथील सब ऑफिसर्स कोर्स उत्तीर्ण, एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण, जड वाहन चालविण्याचा परवाना (३१/०७/२०२५ पर्यंत वैध) | ३१/०५/२०३८ |

१) पुणे अग्निशमन दलाकडील वरील ०६ सेवकांना नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेजकडून प्रवेश देण्यात येईल त्यानुसार टप्याटप्याने पुढील काळामध्ये माहे जुलै २०२५ पासून सुरु होणाऱ्या अगर त्यावेळी प्रवेश न मिळाल्यास त्यापुढील काळात

सुरु होणाऱ्या नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील २५ आठवडे कालावधीचा" स्टेशन ऑफिसर्स अॅन्ड इंन्स्ट्रक्टर्स कोर्स" करिता पुणे मनपाच्या खर्चाने ऑन ड्युटी पाठविणेस.

२) सदरील कोर्सच्या खर्चाकरिता कर्मचाऱ्यांना प्रवेश मिळाल्यास प्रत्येक कर्मचाऱ्यास अंदाजे र.रु.१,००,०००/- प्रमाणे प्रवेश मिळणाऱ्या प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार होणारी रक्कम "तसमलात दुबेरजी ठ, इतर खर्चासाठी उचल या अर्थशिर्षकावर अॅडव्हान्स म्हणून देणेस, सदरील रिकुपमेंट खात्याकडील सन २०२५-२०२६ च्या किंवा ज्या वर्षी प्रवेश मिळेल त्या वर्षीच्या चालू अर्थसंकल्पामधील १४ अग्निशमन पथक, क, आग विझविण्याचे यंत्र (बंब), २ संकीर्ण (बजेट कोड नं.RE24A102) अर्थशिर्षकावरून करणेस.

३) सदरील प्रशिक्षणाचा काळ हा सेवकाचा सेवाकाळ धरणेस, कोर्सकरिता प्रवेश मिळाल्यानंतर संबंधित सेवकाकडून पुढील १० वर्ष पुणे मनपा अग्रिशमन सेवेत राहण्याचा तसेच बढतीच्या जागेवर हक्क न सांगणे बाबतचा करारनामा (बंधपत्र) लिहून घेणेस.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.६३त्वर्य**

नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील "सब ऑफिसर कोर्स" करिता अग्निशमन दलातील फायरमन / प्रमुख अग्निशमन विमोचक या पदावरील खालीलप्रमाणे नमूद दिनांक ३१/१२/२०२३ अखेर च्या प्रारूप सेवाज्येष्ठता यादीनुसार १८ सेवकांना ऑन ड्यूटी पाठविणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/अग्निशमन/५९, दि.२४/०४/२०२५ च पत्र.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | फायरमन पदावर सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | पदनाम | पदनामावरील रुजू दिनांक | शैक्षणिक पात्रता | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. अतुल दिलीप ढगळे | २४/११/२००५ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/१२/२०४० |
| ०२ | श्री. संजय भुजंगराव जाधव | ०३/१२/२००५ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३०/०६/२०२९ |
| ०३ | श्री. अमोल सुरेश कर्डेकर | ३०/०१/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३०/११/२०४१ |
| ०४ | श्री. वसंत तुकाराम भिलारे | २९/०३/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०१/२०३५ |
| ०५ | श्री. संजय शंकर जाधव श्री. | ०३/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०५/२०३५ |
| ०६ | शिवदास बाबुराव खुटवड | ०४/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०७/२०३० |
| ०७ | श्री. शफिक नुरमहम्मद सय्यद | १५/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०५/२०३१ |
| ०८ | श्री. रमेश पांडुरंग चव्हाण | १८/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३०/०४/२०३७ |
| ०९ | श्री. मनिष नामदेव बोंबले | २८/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०३/२०३८ |
| १० | श्री. निलेश बाळासाहेब पोकळे | २८/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३०/०४/२०३९ |
| ११ | श्री. प्रविण ज्ञानदेव रणदिवे | २८/०४/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३०/११/२०४० |
| १२ | श्री. सुनिल गोपाळ नामे | २९/०७/२००६ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०३/२०३४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | श्री. राहुल कृष्णा नलावडे | २६/०३/२००७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०४/२०३४ |
| १४ | श्री. नितीन गणपत टेमगिरे | २६/०३/२००७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/१२/२०३४ |
| १५ | श्री. निलेश शरद महाजन | २६/०३/२००७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०८/२०३५ |
| १६ | श्री. शशिकांत भीमराव पवार | २६/०३/२००७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/१०/२०३६ |
| १७ | श्री. सचिन रामचंद्र शिंदे | २६/०३/२००७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३१/०५/२०३७ |
| १८ | श्री राऊफ अब्दुलगणी शेख | २६/०३/२००७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | २६/१२/२०२२ | पदवीधर एस.एफ.टी.सी. एम.एस.सी.आय.टी. | ३०/११/२०३७ |

१) पुणे अग्निशमन दलाकडील वरील १८ सेवकांना नॅशनल फायर सव्हिस कॉलेजकडून प्रवेश देण्यात येईल त्यानुसार टप्याटप्याने पुढील काळामध्ये माहे जुलै २०२५ पासून सुरु होणाऱ्या अगर यावेळी प्रवेश न मिळाल्यास त्यापुढील काळात सुरु होणाऱ्या नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील २५ आठवडे कालावधीचा "सब ऑफिसर कोर्स" करिता पुणे मनपाच्या खर्चाने ऑन ड्युटी पाठविणेस.

२) सदरील कोर्सच्या खर्चाकरिता कर्मचाऱ्यांना प्रवेश मिळाल्यास प्रत्येक कर्मचाऱ्यास अंदाजे र.रु.१,००,०००/- प्रमाणे प्रवेश मिळणाऱ्या प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार होणारी रक्कम "तसमलात दुबेराजी ठ, इतर खर्चासाठी उचल" या अर्थशिर्षकावर ॲडव्हान्स म्हणून देणेस, सदरील रिकुपमेंट खात्याकडील सन २०२५-२०२६ च्या किंवा ज्या वर्षी प्रवेश मिळेल त्या वर्षीच्या चालू अर्थसंकल्पामधील १४ अग्निशमन पथक, क, आग विझविण्याचे यंत्र (बंब), २ संकीर्ण (बजेट कोड नं.RE24A102) अर्थशिर्षकावरून करणेस.

३) सदरील प्रशिक्षणाचा काळ हा सेवकाचा सेवाकाळ धरणेस, कोर्सकरिता प्रवेश मिळाल्यानंतर संबंधित सेवकाकडून पुढील १० वर्ष पुणे मनपा अग्निशमन सेवेत राहण्याचा तसेच बढतीच्या जागेवर हक्क न सांगणे बाबतचा करारनामा (बंधपत्र) लिहून घेणेस.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.६४त्वर्य**

समान पाणीपुरवठा प्रकल्प पॅकेज ४ अंतर्गत येणाऱ्या टाक्यांकरिता सीमाभिंत / रीटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. J P Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७,६६,९४,०९०/- पेक्षा २२.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,९४,३७,९१९=७५ अधिक जीएसटी र.रु.१,०६,९८,८२६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१२,७७,५१५=७१ पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२,५९,३९०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७,१६,७३,६५१=७५ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१००००००००) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/६०; दि.२४/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /–** xxx
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दि. १६/०५/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /–** xxx
**(डॉ राजेन्द्र ब भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**